# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): अकोला **P.S.**(ठाणे): सिटी कोतवाली
   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0349 **Year** (वर्ष): 2025
   **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 18/12/2025 01:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
   1. **Day**(दिवस): बुधवार **Date From** (दिनांक पासून): 17/12/2025
      **Time Period** (कालावधी): **Date To** ( दिनांक पर्यंत): 17/12/2025
      **Time From** (वेळेपासून): 12:53 बजे
      **Time To** (वेळेपर्यंत): 16:18 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 18/12/2025 **Time** (वेळ): 01:32 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
   **Entry No.** (नोंद क्र.): 005
   **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 18/12/2025 01:32 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
   पूर्व, 2 किमी **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): जिल्हापरीषद प्रवेश दवारालगत ,चहाचे टपरीजवळ अकोला

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.मिलींदकुमार अशोक बहाकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 27/06/1977

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | AKOLA,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | AKOLA,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9158822676

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शैलेंद्र तुळशिराम बगाटे | | | 1. कैलास टेकडी, अकोला ,सिटी कोतवाली,अकोला,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3000/ रुपये लाच रक्कम | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

3,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

यावेळी मा पो नि साहेब याचे आदेशाने HC मांडवगणे ब न150 यांनी अप क्रमांक 349/2025कलम 7(A) भ्रष्टाचार प्रतीबंधक अधिनीयम 1988 प्रमाणे दाखल केला ती पुढील प्रमाणे फिर्याद दिनांकः- 18.12.2025 नावः- श्री.मिलींदकुमार अशोक बहाकर, वय 48 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद-पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, अकोला.मी आज दिनांक 18.12.2025 रोजी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, जि. अकोला येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी पोलीस उपअधीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे कार्यरत आहे.मी दिनांक 17.12.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला कार्यालयात 11.00 वाजताच्या सुमारास कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार दिक्षांत सिध्दार्थ इंगळे, वय 22 वर्षे, शिक्षण- 12 वी, व्यवसाय-मजुरी, जात-बौध्द, रा. भंडारज, ता. पातुर, जि. अकोला हे एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबंधाने तक्रार देण्याकरीता कार्यालयात आले. त्या अनुषंगाने तक्रारदार दिक्षांत इंगळे यांची दोन शासकीय पंचांचे समक्ष तक्रार नोंदविण्यात आली. त्याचा सारांश पुढील प्रमाणे आहे.''मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर येवून तक्रार नोंदावितो की, मी वर नमुद पत्त्यावर परिवारासह राहतो. माझी पत्नी सौ. निता दिक्षांत इंगळे (माहेरचे नाव- निता गोविंदा हागे, जात-हिंदु, बारी) हिच्यासोबत दि. 13/06/2025 रोजी आंतरजातीय प्रेमविवाह झालेला आहे. शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणा-या जोडप्याला 50000/- रुपयांचे अर्थसहाय्य दिल्या जाते. त्यानुसार सदर अर्थसहाय्य मिळण्याकरीता मी जिल्हा परिषद, अकोला येथील समाज कल्याण विभागात दि. 02/09/2025 रोजी संपुर्ण कागदपत्रांसह रितसर अर्ज दाखल केलेला आहे. त्याबाबतची पोचपावती मी यासोबत सादर करीत आहे.परंतु बराच कालावधी उलटुन गेल्यावरही मला अर्थसहायाची रक्कम मिळाली नाही. त्यामुळे त्याबाबत विचापूस करण्याकरीता दि. 16/12/205 रोजी दुपारी मी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथे गेलो होतो. सदर ठिकाणी मला नमूद योजनेशी संबधीत कामकाज बघणारे बगाटे बाबु हे भेटले. तेव्हा मी त्यांना खुप दिवस झाले तरी अद्यापपावेतो शासनाची 50000/- रूपये अर्थसहाय्याची रक्कम मला मिळाली नसल्याचे सांगितले, त्यावेळी बगाटे बाबु यांनी मला एका कागदावर इंग्रजी आकड्यामध्ये 5000/-रूपयांचा आकडा लिहून तो कागद दाखविला, आणि मला म्हणाले की, इतके पैशे आणून मला दे, मी तुला शासनाचा 5000/-रूपये काढुन देतो.'' असे म्हणून मला 5000/-रूपयांची मागणी केली. त्यावर मी त्यांना '' माझ्याजवळ सध्या एवढे पैसे नाहीत, मी तुम्हाला उद्या पैश्यांची व्यवस्था करून आणून देतो.'' असे नाईलाजास्तव म्हणून तिथुन निघुन आलो.तरी बगाटे बाबु यांनी मला शासनाकडुन आंतरजातीय विवाह योजने अंतर्गत अर्थसहाय्य म्हणुन मिळणारे 50000/- रुपये काढुन देण्यासाठी मागीतलेले 5000/- रुपये ही रक्कम कोणतेही शासकीय शुल्क नसुन, ते मला 5000/- रुपये हे लाच म्हणुन मागत आहेत याची मला खात्री आहे. तरी बगाटे बाबु यांना लाच म्हणुन 5000/- रुपये देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. करीता बगाटे बाबु यांनी मला 5000/- रुपये लाचेची मागणी केल्याने त्यांच्या विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात यावी.''वरीलप्रमाणे तक्रारदार दिक्षांत इंगळे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 17.12.2025 रोजी चे 12.53 वा. ते 13.27 वा. दरम्यान समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथे पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ. बगाटे यांनी तक्रादाराकडे 5000/-रुपये लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती पहिला टप्पा म्हणुन 3000/- रुपये लाच रक्कम आणुन देण्यास व उर्वरीत 2000/- रुपये नंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन झाले. सदर कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पुर्व व पडताळणी पंचनामा करून सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर दिनांक 17.12.2025 चे 16.03 ते 16.18 वा. दरम्यान गै.अ. बगाटे यांच विरूध्द जिल्हा परिषद, अकोला येथे दोन्ही पंचासमक्ष सापळा कार्यवाही करण्यात आली. सदर सापळा कार्यवाही दरम्यान शैलेंद्र तुळशिराम बगाटे, व्यवसाय-एजंट/खाजगी शिक्षक, रा. कैलास टेकडी, अकोला तक्रारदार दिक्षांत इंगळे याचेकडुन लाच रक्कम रू. 3000/- जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा, जि.प.,

अकोलाच्या लगत असलेल्या जिल्हा परिषद, अकोलाच्या प्रवेशव्दारालगत असलेल्या चहाच्या टपरीजवळ स्विकारली. त्यावेळी तक्रारदार दिक्षांत इंगळे यांनी गै.अ. बगाटे याने लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इषारा केल्याने अॅन्टी करप्षन ब्युरोच्या पथकाने गैरअर्जदार बगाटे यांना पंचासमक्ष लाच रकमेसह ताब्यात घेतले. सदर कार्यवाहीचा सविस्तर सापळा पुर्व व सापळा पंचनामा तयार करण्यात आलेला आहे.एकंदरीत दिनांक 17.12.2025 चे 12.53 वा. ते 16.18 वा. दरम्यान करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान शैलेंद्र तुळशिराम बगाटे, व्यवसाय-एजंट/खाजगी शिक्षक, रा. कैलास टेकडी, अकोला यांनी तक्रारदार दिक्षांत इंगळे यास समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथुन शासनाकडुन आंतरजातीय विवाह योजने अंतर्गत अर्थसहाय्य म्हणुन मिळणारे 50,000/- रुपये काढुन देण्यासाठी तक्रारदाराकडे 5000/- रुपये लाच रकमेची मागणी केल्याने तसेच तडजोडीअंती पहिला टप्पा म्हणुन 3000/- रुपये लाच रक्कम तक्रारदाराकडुन स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडुन त्यांचे कडुन लाच रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. अशा लेखी फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
PRAKASH PUNDALIK MANDAGAWANE
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb Impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANJAY NATTHU GA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ठाणेदार ऑफीसर
पो. स्टे. सिटी कोतवाली, अकोला